# देगलूर महाविद्यालयात रस्ता सुरक्षा हेल्मेट रॅली संपन्न

देगलूर - अडत व्यापारी शिक्षण संस्था संचालित देगलूर महाविद्यालय व प्रादेशिक परिवहन कार्यालय नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा हेल्मेट रॅली संपन्न झाली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी देगलूरचे तालुका न्यायाधिश मा. श्री अमित सिंह आर. मोहने होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उप प्रादेशिक परिवहन अधिकारी नांदेड मा.श्री.अविनाश राउत, देगलूरचे तहसीलदार मा.श्री.राजाभाऊ कदम, पोलीस निरीक्षक श्री सोहन माछरे, .अ.व्या.शि. संस्था कोषाध्यक्ष विलास तोटावार कार्यकारिणी सदस्य देवेंद्र मोतेवार प्राचार्य डॉ. मोहन खंताळ, मोटार वाहन निरीक्षक भरत गायकवाड, सहा.मोटार वाहन निरीक्षक धीरज गवळी उपस्थित होते



यावेळी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भरत गायकवाड यांनी केले.या प्रसंगी पोलीस निरीक्षक सोहन माछरे, प्राचार्य डॉ. मोहन खताळ, तहसीलदार राजाभाऊ कदम, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अविनाश राऊत यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ.ए.बी.चिद्रावार, उपप्राचार्य एम.एम. चमकुडे, यांच्यासह डॉ.नीरज उपलचवार व एन.सी.सी. विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बी.आर. कतुरवार यांनी आभार धीरज गवळी यांनी मानले . यावेळी देगलूर महाविद्यालय ते नवीन बसस्थानक हेल्मेटसह मोटार सायकल रॅली काढण्यात आली.

Scanned with OKEN Scanner